माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये प्राप्त झालेली तक्रार
## तक्रार क्रमांक : ११८/२०२२

तक्रारकर्ता, श्री. प्रकाश सोमाजी नाकतोडे,

--विरुध्द--

जन माहिती अधिकारी, तथा कनिष्ठ लिपीक (पुनर्वसन)
जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा, ता.जि. भंडारा

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन)
जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा, ता.जि. भंडारा

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★नागपूर★ सत्यमेव जयते

तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १०.०१.२०२४

तक्रारकर्ता : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| १४.०२.२०२२ | --- | ०९.०६.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. ३२७३/२०१९ मध्ये दिनांक १४.०२.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १०.०१.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा, ता. जि. भंडारा कु. व्ही. पी. वासनिक उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा, ता. जि. भंडारा श्रीम. लिना फलके उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. ३२७३/२०१९ मध्ये दिनांक १४.०२.२०२२ रोजी सुनावणी घेवून " या प्रकरणात विद्यमान जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी संबंधित प्राधिकरणाशी स्वत:

संपर्क साधून अपिलार्थी यांना अपेक्षित असलेल्या माहितीचा पुरवठा करण्यात आला किंवा नाही यांची खातरजमा करून घ्यावी. तसेच सदर आदेश प्राप्त झाल्याच्या २ आठवड्याच्या आत वरील माहिती अपिलार्थी यांना प्रदान करण्यात येईल याची खातरजमा करावी. याबाबतीत प्रथम अपिल अर्ज दिनांक १६.०९.२०१९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांचेकडे सादर करण्यात आला आहे. मात्र यात याआधीच वरील माहिती अर्ज विविध प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. त्यामुळे तो योग्य प्राधिकरणाकडे प्रथम अपिल अर्ज करणे आवश्यक आहे. मात्र अर्जदारास एकाही प्राकिरणाकडून माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे वरील माहिती अर्ज ज्यांचेकडे केलेला आहे. त्यांनी संबंधित प्राधिकरणाकडून सदर आदेश प्राप्त होताच २ आठवड्याच्या आत माहिती संकलित करून अपिलार्थीस माहिती प्रदान करण्याबाबत ठोस पाऊले उचलावी व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा ," असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक ०९.०६.२०२२ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. तक्रारकर्ता यांनी द्वितीय अपील क्र. ३२७३/२०१९ मध्ये दिनांक १४.०२.२०२२ रोजी पारित आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवित तक्रार दाखल केली. त्यात त्यांनी जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती व शिस्तभंगाची कारवाई करून त्यांना कलम १९ (८) (ख) नुसार नुकसान भरपाई प्रदान करण्याची विनंती केली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणतीही माहिती प्रदान केली नसल्याचे अपिल क्र. ३२७३/२०१९ मध्ये सविस्तर ऊहापोह केले असल्यामुळे त्यावर कोणतेही भाष्य करणे योग्य नाही. आयोगाच्या वतीने प्रथम अपिलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांना दि. ०८.१२.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या सूचनेवर उपजिल्हाधिकारी (पुर्नवसन), भंडारा यांनी दि. ३०.१२.२०२२ रोजी सविस्तर खुलासा सादर केला. सदर खुलासाचे अवलोकन केले असता, वरील अपिल आदेशाचे अनुपालन करण्याच्या दृष्टीने अपिलार्थी यांना दि. २८.१२.२०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत पाचारण करण्यात आले. परंतु तक्रारकर्ता हजर झाले नाही. याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, भंडारा यांच्यावतीने दस्ताऐवज सादर केला आहे. तक्रारकर्ता यांनी प्रस्तुत प्रकरणी केलेली विनंती कलम १८ (१) च्या कार्यकक्षेच्या बाहेर असल्यामुळे तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा. पांडे)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

सत्यमेव जयते

★नागपूर★

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १०.०१.२०२४**

जा. क्र. 1870 दि. 27 MAR 2024



G:\SS/ तक्रार १०.०१.२०२४\११८-२०२२ श्री. प्रकाश् नाकतोडे.docx